सहाय्यक लेखाधिकारी गट-क या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या
सर्वसाधारण बदल्या व नेमणूका 2025 **(विनंती बदली)**

अर्थ विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश क्र. अर्थ/कार्या-1/आस्था-1/ 174 /2025
अहिल्यानगर, दिनांक - 14/05/2025
19/05/2025

संदर्भ- 1.ग्रा.वि.वि. व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.जिपब/414/प्र.क्र.112/आस्था/14/ दिनांक 15/05/2014,

2.महाराष्ट्र शासन,ग्रामविकास विभाग शासन पुरकपत्र क्र.जिपब-4817/प्र.क्र.288/आस्था14 दिनांक 07 मार्च 2019

3. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय दिनांक 9 जुलै 2021

4. सर्वसाधारण बदल्याबाबतचे दिनांक 14.05.2025 रोजीचे मंजूर इतिवृत्त.

शासनाकडील संदर्भ क्रमांक 1 च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदशक सूचनेनुसार, संदर्भ क्र.2 व 3 अन्वयेचे शुध्दीपत्रक व तदअनुषंगिक निर्णयातील तरतूदींनुसार, जिल्हा परिषदेच्या अंतर्गत अर्थ विभागाच्या अधिनस्त लेखा संवर्गातील कार्यरत असलेल्या सहाय्यक लेखाधिकारी संवर्गातील खालील कर्मचा-याने वयाची 53 वर्ष पूर्ण झाल्याने त्यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार उक्त संदर्भ क्र.1 मधील प्रकरण 1 4 (4) (10) नुसार संबधिताची समुपदेशनाने त्यांच्या नांवापुढे रकाना क्र. 4 मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी **विनंती** बदलीने पदस्थापना देण्यांत येत आहे.

| .अ.क्र | कर्मचाऱ्याचे नांव | सध्याचे कार्यरत ठिकाण | बदलीने द्यावयाचे ठिकाण | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | श्री.अशोक उत्तमराव घाणमोडे | पंचायत समिती कर्जत | जि.प.सा.बां.दक्षिण विभाग, जि.प. अहिल्यानगर | **वयाची 53 पुर्ण झाल्याने विनंती बदली** |

उपरोक्त आदेशात नमुद कर्मचाऱ्यांना दिनांक 31/05/2025 रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करणेत यावे. संदर्भ क्र.1 मधील शासन निर्णयामधील प्रकरण क्र.1 बाब क्र. 7 नुसार बदली होणेपूर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन दिनांक 01/06/2025 नंतर त्यांचे वेतन व भत्ते अदा करु नयेत तसेच पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदीन म्हणून गणला जाईल.

या आदेशाची अंमलबजावणी न केल्यास त्याबाबत गंभीर दखल घेणेत येईल. **सदरची बदली विनंती कारणास्तव असल्याने त्यांना पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.**

तसेच संदर्भ क्र.1 मधील शासन निर्णय प्रकरण-1 मधील बाब क्र. 8 (1) नुसार बदली ही संपुर्ण प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव वापरल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 6(5) चा भंग केला म्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील.

बदली झालेल्या कर्मचाऱ्यांनी रजेवर न जाता बदलीने पदस्थापना केलेल्या ठिकाणी त्वरित हजर व्हावे. सदरचा आदेश हा अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या **www.nagarzp.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202505190500028 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री.अशोक उत्तम घाणमोडे, सहाय्यक लेखाधिकारी ,पंचायत समिती कर्जत,ता.कर्जत, अहिल्यानगर

प्रत - गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत, ता.कर्जत, जि. अहिल्यानगर
2/- उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचाऱ्यास स्थानिक व्यवस्था करुन कार्यमुक्त करावे.

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत - कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बां.दक्षिण विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत - आस्थापना – 02, अर्थ विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत - निवड नस्ती.